महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा)- सत्र-108
अंतीम परिक्षा

पेपर क्र. VII
विषय - Maintenance of Public Peace & Order

शनिवार - 24/08/2013
वेळ - 15.00 ते 18.00
गुण - 100

**********************************************************************

सुचना- अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. -- All questions are compulsory.
ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहेत. -- Marks for each question are indicated there-against.
क. वाचनीय अक्षरात लिहावे. शब्द-मर्यादा पाळावी. -- Write legibly. Abide by word limit.
ड. फक्त निळ्या/काळ्या बॉलपेनचाच वापर करावा. -- Use blue/black ball point pen only.

**********************************************************************

गुण / Marks

**खालील माहितीच्या आधारावर प्रश्न क्र.1 व प्रश्न क्र.2 ची उत्तरे द्या.**

भवानीपुर हे ठाणे जिल्हयातील एक दाट लोकसंख्येचे उपनगर आहे. तिथे झोपडपट्टीवासी व मध्यमवर्गीय रहिवासी राहतात. मार्च महिन्यात येथे वारंवार वीज खंडीत झाली. त्यामुळे दिनांक 23/08/2013 रोजी सायं. 2000 वा. दरम्यान महावितरणच्या कार्यालयाबाहेर गर्दी जमा झाली व दगडफेक सुरु झाली. सदर घटनेमध्ये आजुबाजूच्या रहिवाशानी देखील भाग घेतला, व महावितरणच्या कार्यालयास आग लावली. सदर ऑफीसकडे येणारे रस्ते अरुंद आहेत. अशा अरुंद रस्त्यांवर साधारणतः 5000 स्त्री व पुरुष असा जमाव रात्री 20.00 नंतर जमून वरीलप्रमाणे उपद्रव करीत होता.

प्र.क्र. 1 भवानीपुर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी म्हणून वरील नमूद परिस्थिती नियंत्रणात आणण्याकरिता तुम्ही काय उपाययोजना कराल? **(150 शब्द)** ( 10 )

प्र.क्र. 2 दिनांक 24/08/13 च्या सकाळी, गोपनीय माहिती संकलन, अधिकारी / कर्मचाऱ्यांना ब्रीफिंग व पोलीस बळाचे वाटप व वापर याबाबत आपण काय पावले उचलाल, जेणेकरुन परिसरात शांतता राहिल, व अवांछित घटना परत घडणार नाही? विवेचन करा. **(150 शब्द)** ( 10 )

प्र.क्र. 3 उंबरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालय हे राष्ट्रीय महामार्गावर आहे. दिनांक 31 ऑगस्ट 2013 रोजी सकाळी 10 वा. तेथे 10 हजार महिलांचा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी येणेबाबत माहिती मिळाली आहे. हा मोर्चा सर्वपक्षीय असुन यात काही प्रमुख पुरुष नेते देखील असतील. उंबरावती जिल्हयातील एका गावातील दोन मुलींची हत्या झाल्याच्या निषेधार्थ हा मोर्चा काढण्यात येणार आहे.
ठाणे प्रभारी अधिकारी या नात्याने हा मोर्चा शांततेत पार पडण्यासाठी, गोपनीय माहिती संकलन करणे, भेटी व बैठका, गर्दीचे सुनियोजीत व्यवस्थापन व मोर्चाचे मार्गक्रमणाकरिता आपण कोणत्या उपाययोजना कराल? **(225 शब्द)** ( 15 )

प्र.क्र. 4 आपण बीट पोलीस उपनिरीक्षक असलेल्या ठाण्यात पुढील आठवडयात विधानसभा निवडणूका आहेत. आपल्या बीट मध्ये एक मतदान केंद्र आहे. यामध्ये एकुण 10 मतदान बुथ्स आहेत. आपण याठिकाणी कोणत्याही अवांछित घटनेपासून मुक्त व स्वतंत्र निवडणूक होण्याकरिता कोणत्या उपाययोजना कराल? **(150 शब्द)** ( 10 )

| | | | |
|---|---|---|---|
| प्र.क्र. 5 | पोलीस ठाण्याच्या 'दंगा काबू योजनेत' कोणत्या महत्वाच्या बाबी समाविष्ट असतात? | (75 शब्द) | ( 05 ) |
| प्र.क्र. 6 | नक्षलवाद्यांना समाजाकडून सहानुभूती व सहकार्य मिळण्याची काय कारणे आहेत? | (150 शब्द) | ( 10 ) |
| प्र.क्र. 7 | टिपा लिहा. (प्रत्येकी 75 शब्द) | | (10 ) |
| | अ) विमानतळावरील प्रवाशांची तपासणी | | [05] |
| | ब) व्ही.व्ही.आय.पी. च्या मिटिंगच्या मंचाची तपासणी | | [05] |
| **प्र.क्र. 8** | **अतिमहत्वाच्या व्यक्तीना कोणते संभाव्य धोके असतात?** | **(150 शब्द)** | (1 0 ) |
| **प्र.क्र. 9** | **टीप लिहा -** वाहतूक व्यवस्थापनाचे तीन आधारस्तंभ ( उदाहरणांसह ). | **(150 शब्द)** | (1 0 ) |
| **प्र.क्र. 10** | **प्रत्येकी 04 ओळींमध्ये खालील संज्ञा स्पष्ट करा.** (प्रत्येकी 02 गुण) | | (1 0 ) |
| **10-अ)** | त्रयस्थ पक्षकार विमा | | |
| **10-ब)** | सिग्नल एकसुत्रीकरण / समानीकरण | | |
| **10-क)** | रस्त्यावरील घसरण्याच्या खुणा (Skid marks) | | |
| **10-ड)** | रस्त्यावरील उद्रेक (Road-Rase) | | |
| **10-इ)** | श्वास तपासणी यंत्र | | |

*********************************************************************